सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - ११५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. १५ जून २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

# नीट परीक्षेच्या प्रश्नपत्रिका हेलिकॉप्टरने अमरावतीत दाखल

## कडेकोट पोलिस बंदोबस्तात कोषागार भवनात जमा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५ अमरावती :** देशभरात नीट परीक्षेच्या प्रश्नपत्रिका फुटल्याच्या घटनांनंतर यंदाच्या परीक्षेसाठी प्रशासनाने विशेष खबरदारी घेतली आहे. २१ जून रोजी होणाऱ्या नीट परीक्षेच्या पार्श्वभूमीवर मुंबईहून प्रश्नपत्रिका थेट हेलिकॉप्टरद्वारे अमरावतीत आणण्यात आल्या. कडक पोलीस बंदोबस्त आणि सुमारे १५ वाहनांच्या ताफ्यातून या प्रश्नपत्रिका अमरावती जिल्हा कोषागार भवनात सुरक्षितपणे पोहोचविण्यात आल्या. प्रश्नपत्रिकांच्या वाहतुकीदरम्यान संपूर्ण मार्गावर सुरक्षा यंत्रणा सतर्क ठेवण्यात आली होती. कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी स्थानिक पोलिसांसह विविध सुरक्षा यंत्रणांची मदत घेण्यात आली. यावेळी पोलिसांचा १५ वाहनांचा ताफा.सोबतचसुरक्षेसाठी केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल (उखडऋ) चे जवान,महसूल विभाग अन् भारतीय डाक सेवेचे कर्मचारी-अधिकारी तैनात करण्यात आले होते.

प्रशासनाने प्रश्नपत्रिकांच्या सुरक्षित साठवणुकीसाठी जिल्हा कोषागार



परिसरात बहुस्तरीय सुरक्षा व्यवस्था उभारली आहे. महसूल विभाग, पोलीस विभाग, भारतीय डाक सेवा तसेच अन्य संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी या संपूर्ण प्रक्रियेत सहभागी झाले आहेत. प्रश्नपत्रिकांच्या हालचालींवर सीसीटीव्हीद्वारे नजर ठेवण्यात येत असून प्रवेशावरही कडक निर्बंध घालण्यात आले आहेत.नीट परीक्षेची पारदर्शकता आणि विश्वासार्हता कायम राखण्यासाठी यंदा प्रशासनाने कोणतीही जोखीम न पत्करता अभूतपूर्व उपाययोजना केल्या आहेत. त्यामुळे २१ जून रोजी होणारी परीक्षा सुरळीत, सुरक्षित आणि गैरप्रकारमुक्त वातावरणात पार पडेल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

### २१ जूनच्या परीक्षेसाठी अभूतपूर्व सुरक्षा व्यवस्था

#### अमरावती जिल्हा कोषागार भवनाला छावणीचं स्वरुप...

नीट परीक्षेच्या पेपरफुटीनंतर आता मोठी खबरदारी घेतली जात आहे. अमरावतीमध्ये नीट परीक्षेसाठीचे पेपर चक्क हेलिकॉप्टरमधून आणण्यात आले. मुंबईवरुन गाडीमध्ये नाही तर हेलिकॉप्टरमधून हे पेपर अमरावतीमध्ये पोहोचवण्यात आले. प्रचंड पोलीस बंदोबस्तात आणि १५ वाहनांच्या ताफ्यात हे पेपर अमरावती जिल्हा कोषागार भवनात ठेवण्यात आले. पेपरच्या सुरक्षेसाठी उखडऋ चे जवानही तैनात करण्यात आले आहेत. नीटचा पेपर फुटल्याने ही परीक्षा पुन्हा एकदा २१ जूनला होणार आहे. पुन्हा कोणताही गैरप्रकार होऊ नये यासाठी प्रशासनाकडून विशेष खबरदारी घेतली जातेय.

# राज्याचं पावसाळी अधिवेशन २२ जूनपासून सुरू होणार

## कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत ३ आठवड्यांच्या सत्रावर शिक्कामोर्तब



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५मुंबई** महाराष्ट्र विधिमंडळाच्या आगामी पावसाळी अधिवेशनाचे सविस्तर वेळापत्रक ठरवण्यासाठी आज मुंबईत पार पडलेली 'कामकाज सल्लागार समितीची' महत्त्वाची बैठक आता संपली आहे. या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार, राज्याचे पावसाळी अधिवेशन २२ जून ते १० जुलै २०२६ या कालावधीत मुंबईत होणार असल्याचे निश्चित झाले आहे. कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये सविस्तर चर्चा झाली. या बैठकीत अधिवेशनाचा कालावधी निश्चित करण्यात आला असून, आगामी पावसाळी अधिवेशनाचे कामकाज एकूण तीन आठवडे चालणार आहे. या तीन आठवड्यांच्या कालावधीत अनेक महत्त्वाची विधेयके, जनहिताचे प्रश्न आणि शासकीय कामकाज पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.सध्या राज्यातील शेतकऱ्यांचे प्रश्न, कर्जमाफी, आगामी निवडणुका आणि राजकीय घडामोडी पाहता हे तीन आठवड्यांचे पावसाळी अधिवेशन अत्यंत वादळी ठरण्याची शक्यता आहे. विरोधकांनी विविध मुद्द्यांवरून सरकारला कोंडीत पकडण्याची तयारी केली असून, सत्ताधारी पक्ष देखील विरोधकांना चोख उत्तर देण्यासाठी सज्ज झाला आहे. त्यामुळे २२ जूनपासून मुंबईत हायव्होल्टेज राजकीय रणसंग्राम पाहायला मिळणार आहे.

### अधिवेशन नव्हे, आगामी निवडणुकांची रंगीत तालीम

राजकीय जाणकारांच्या मते, हे अधिवेशन प्रत्यक्षात आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका, मुंबई महापालिका निवडणूक आणि पुढील राजकीय लढतींची रंगीत तालीम ठरणार आहे. सभागृहातील प्रत्येक मुद्द्याचा वापर राजकीय संदेश देण्यासाठी केला जाणार असल्याने २२ जून ते १० जुलै हा कालावधी महाराष्ट्राच्या राजकारणासाठी अत्यंत निर्णायक ठरणार आहे.एकूणच, दुष्काळ, कर्जमाफी, आरक्षण, गुन्हेगारी, शेतकरी, बेरोजगारी आणि महायुतीतील अंतर्गत संघर्ष या सर्व मुद्द्यांमुळे यंदाचे पावसाळी अधिवेशन हे केवळ कामकाजाचे अधिवेशन न राहता सरकारच्या कामगिरीची खरी कसोटी आणि विरोधकांसाठी मोठी राजकीय संधी ठरणार आहे.

# ठाकरे गटात पुन्हा भूकंप होणार?

## खासदार वेगळा गट स्थापन करण्याच्या तयारीत

### संजय राऊत तातडीने दिल्लीला रवाना होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५मुंबई** - महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठ्या घडामोडींना वेग आलाय. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेत संभाव्य फुटीच्या चर्चांनी जोर धरला आहे. उद्धव ठाकरे यांनी नुकतीच पक्षाच्या खासदारांची तातडीची बैठक मातोश्रीवर बोलावली होती. बैठकीनंतर सर्व खासदार पक्षासोबत असल्याचा दावा ठाकरे गटाने केला असला, तरी काही खासदार नव्या गटाच्या स्थापनेच्या तयारीत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, ठाकरे गटातील काही खासदार लोकसभा अध्यक्षांकडे स्वतंत्र गटाबाबत पत्र देण्याच्या तयारीत



आहेत. याचदरम्यान काही खासदारांनी दिल्लीत केंद्रीय राज्यमंत्री तथा शिंदे गटाचे नेते प्रतापराव जाधव यांची भेट घेतल्याची माहिती समोर आली आहे.

विशेष म्हणजे, मातोश्रीवरील बैठकीला काही खासदार अनुपस्थित राहिल्याने या चर्चांना आणखी बळ मिळाले आहे. या सर्व घडामोडींमुळे ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत तातडीने दिल्लीला रवाना झाल्याची माहिती असून, पुढील काही दिवसांत राज्याच्या राजकारणात मोठी उलथापालथ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच राहणार- मुनगंटीवार

या संपूर्ण हायव्होल्टेज चर्चेवर भाजपचे ज्येष्ठ नेते आणि मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी मोठी प्रतिक्रिया देत थेट पूर्णविराम लावला आहे. पत्रकारांनी मुनगंटीवारांना विचारले की, ५ खासदार आल्यानंतर एकनाथ शिंदे मुख्यमंत्री होतील असं वाटतंय का?' वर रोखठोक उत्तर देत मुनगंटीवार म्हणाले, पाच खासदार आले की एकनाथ शिंदे मुख्यमंत्री होतील असं काही नाही. स्वतः शिंदेंनी विधानसभा निवडणुकीच्या वेळीच जाहीर केले होते की ते मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार नाहीत. त्यामुळे सध्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच आहेत आणि तेच राहणार आहेत. मुनगंटीवारांच्या या विधानामुळे मुख्यमंत्रीपदाच्या संभाव्य चर्चेला आता ब्रेक लागला आहे. अशी प्रतिक्रिया मुनगंटीवार यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना दिली.

### आता आलेल्या परिस्थितीला भाजपलाच सामोरे जावे लागेल

# विधान परिषदेवरून महायुतीत धुसफूस वाढली

## शंभूराज देसाईंचा थेट इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५मुंबई** - सातारा-सांगली विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीतील अंतर्गत मतभेद पुन्हा एकदा उघडपणे समोर आले आहेत. भाजपने उमेदवार जाहीर केल्यानंतरही शिवसेनेचा पाठिंबा अद्याप स्पष्ट झालेला नसताना राज्याचे मंत्री शंभुराज देसाई यांनी भाजपला थेट इशारा दिला आहे. नगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकांवेळी आम्ही समन्वयाचा प्रयत्न केला, पण भाजपकडून प्रतिसाद मिळाला नाही. आता जी परिस्थिती निर्माण झाली आहे, तिला भाजपलाच सामोरे जावे लागेल, असे स्पष्ट शब्दांत देसाई यांनी सुनावले.

त्यामुळे सातारा-सांगली मतदारसंघातील विधानपरिषद निवडणूक केवळ भाजप आणि विरोधकांमधील लढत न राहता महायुतीतील अंतर्गत नाराजीचीही परीक्षा ठरणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे.



**धैर्यशील कदमांच्या उमेदवारीनंतर शिवसेना अद्याप नाराज?**

सातारा-सांगली स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून भाजपने धैर्यशील कदम यांना उमेदवारी दिली आहे. मात्र उमेदवारी जाहीर झाल्यानंतरही शिंदे गटाच्या शिवसेनेकडून पूर्ण ताकदीने पाठिंबा जाहीर झालेला नाही.नगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकांवेळी आम्ही समन्वयाचा प्रयत्न केला, पण भाजपकडून प्रतिसाद मिळाला नाही. आता जी परिस्थिती निर्माण झाली आहे, तिला भाजपलाच सामोरे जावे लागेल, असे स्पष्ट शब्दांत देसाई यांनी सुनावले.विशेष म्हणजे, जिल्हा परिषद आणि नगरपालिका निवडणुकांदरम्यान झालेल्या राजकीय संघर्षाची सल शिवसेना नेत्यांच्या मनात अद्याप कायम असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळेच विधानपरिषद निवडणुकीत शिवसेना कोणती भूमिका घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# धरणांतील पाणी शेतीसाठी बंद!

## उपलब्ध पाणी प्रामुख्याने पिण्याच्या वापरासाठी राखीव ठेवण्याचे जलसंपदा मंत्री विखे पाटलांचे आदेश



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५मुंबई**

राज्यातील अपुऱ्या पावसामुळे निर्माण झालेल्या गंभीर जलसंकटाच्या पार्श्वभूमीवर जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मोठा निर्णय घेतला आहे. ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत धरणांमधील उपलब्ध पाणी प्रामुख्याने पिण्याच्या वापरासाठी राखीव ठेवण्याचे आदेश देण्यात आले असून अनेक भागांमध्ये शेतीसाठीचे आवर्तन बंद करण्यात आले आहे. या निर्णयानंतर विरोधकांनी सरकारवर जोरदार टीका सुरू केली असून विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारच्या नियोजनावरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

धरणांमध्ये फक्त २५ टक्के उपयुक्त जलसाठा

पुण्यातील सिंचन भवन येथे झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत कृष्णा आणि गोदावरी खोऱ्यातील धरणांमधील पाणीसाठा, पावसाची स्थिती आणि संभाव्य टंचाईचा आढावा घेण्यात आला. यावेळी विखे-पाटील यांनी अधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश दिले की, राज्यातील उपलब्ध पाणी ३१ ऑगस्टपर्यंत नागरिकांच्या पिण्याच्या गरजांसाठी सुरक्षित ठेवले जावे. त्यांच्या माहितीनुसार, राज्यातील धरणांमध्ये सध्या केवळ २५ टक्के उपयुक्त जलसाठा उपलब्ध आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत ही पातळी लक्षणीयरीत्या कमी आहे. यंदा मान्सूनने अपेक्षित हजेरी न लावल्याने धरणांमध्ये नवीन पाण्याची आवकही अत्यल्प झाली आहे.

**शेतीसाठीचे आवर्तन थांबवले** या निर्णयाचा सर्वात मोठा फटका शेतकऱ्यांना बसण्याची शक्यता आहे. खडकवासला धरणातून शेतीसाठी सोडण्यात येणारे पाणी शनिवारी दुपारी तीन वाजल्यापासून बंद करण्यात आले आहे. राज्यभरातील इतर धरणांबाबतही परिस्थितीनुसार अशाच उपाययोजना केल्या जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

जलसंपदा विभागाने स्पष्ट केले आहे की, धरणांमध्ये मोठ्या प्रमाणावर नवीन पाण्याची आवक होईपर्यंत उपलब्ध पाण्याचा वापर अत्यंत सावधगिरीने करावा लागणार आहे.

# एकनाथ शिंदेंचं नाव वगळलं, महायुतीत संघर्ष पेटला

## शिवसैनिकांकडून गणेश नाईकांची गाडी अडवण्याचा प्रयत्न

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५मुंबई**

नवी मुंबई महापालिकेकडून नवीन आरोग्य सेवा सुरू करण्यात आली. या सेवेचा शुभारंभ सोमवारी (१५ जून) झाला. मात्र, या कार्यक्रमावरून महायुतीतच नवा राजकीय संघर्ष शिलगला आहे. कार्यक्रमपत्रिकेवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नाव नसल्याने शिवसैनिक आक्रमक झाले. भाजपाकडून मुद्दामहून डावलण्यात आल्याचा आरोप करत शिवसैनिकांनी कॅबिनेट मंत्री तथा भाजपाचे नेते गणेश नाईक यांची गाडी अडवण्याचा प्रयत्न केला. शिंदेसेनेकडून काळे झेंडे दाखवत घोषणाबाजी करण्यात आली. त्यामुळे नवी मुंबईत महायुतीतच राजकीय राडा झाल्याचे बघायला मिळाले.

नवी मुंबई महापालिकेकडून सुरू करण्यात आलेल्या आरोग्य सेवा कार्यक्रमाच्या उद्घाटन पत्रिकेवरुन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे वगळण्यात आले. जिल्ह्याचे पालकमंत्री असूनही शिंदे यांचे नाव वगळण्यात आल्याने शिंदेसेनेचे नेते कार्यकर्ते आक्रमक झाले. त्यानंतर शिंदेसेनेच्या कार्यकर्त्यांनी आंदोलनही केले. कार्यक्रमाच्या





पत्रिकेवरून नाव वगळल्याच्या प्रकाराचा निषेध करत शिवसैनिकांनी वाशी येथे मंत्री गणेश नाईक यांच्या वाहनाला काळे झेंडे दाखवले. त्यानंतर शिवसैनिकांनी बेलापूरमधील नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात निषेध आंदोलन केले. निमंत्रण पत्रिकेत पालकमंत्री एकनाथ शिंदे यांचे नाव का वगळण्यात आले, याबाबत त्यांनी महानगरपालिका प्रशासनाकडे जाब विचारला.

यासंदर्भात जेव्हा गणेश नाईक यांना माध्यमांशी प्रश्न केला, तेव्हा याबद्दल महापौरांना विचारावं असे उत्तर त्यांनी दिले. दरम्यान, या नव्या प्रकरणाने नवी मुंबईत महायुतीतील संघर्ष थांबलेला नसल्याचे पुन्हा सिद्ध झाले आहे. त्यामुळे हा संघर्ष आगामी काळात कोणते वळण घेणार, याबद्दल नव्या चर्चा सुरू झाल्या आहेत.

## संपादकीय ......

# ममतांची कसोटी

*पश्चिम बंगालच्या राजकारणात चार दशके केंद्रबिंदू असलेल्या ममता बॅनर्जींना त्यांनी स्थापन केलेल्या तृणमूल काँग्रेस पक्षाला अस्तित्वासाठी लढण्याची वेळ आली आहे. ममता म्हणजे संघर्ष असे बंगालच्या राजकारणात समीकरण बनले होते. हट्टी स्वभावामुळे त्यांनी कुणापुढे मान तुकवली नाही किंवा हार मानली नाही. काँग्रेसमध्ये असतानाही दिल्लीतील श्रेष्ठींना कधी जुमानले नाही. सोनिया गांधींना आव्हान देण्यापर्यंत त्यांची मजल गेली होती. आपलाच पक्ष म्हणजे खरी काँग्रेस हे त्यांनी राज्यात सिद्ध केले; पण यंदाच्या विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर व सत्ता गमावल्यानंतर ममता यांना सोनिया गांधींकडे जाऊन त्यांच्याकडून सांत्वन करून घेण्याची वेळ आली. ममता यांनी जे पेरले तेच उगवले. त्यांनी कधी संयमाचे राजकारण केले नाही. त्यांनी तीन दशकांचे वर्चस्व असलेली पश्चिम बंगालमधील डाव्या आघाडीची सत्ता उलथवून टाकली.*

*स्वत:चा वेगळा पक्ष स्थापन करून काँग्रेस संकुचित केली. भाजपशी निकराने लढाई दिली; पण भाजपच्या बलाढ्य ताकदीपुढे ममता यांना सत्ता गमवावी लागली. पराभव झाल्यानंतर त्यांच्यावरील राजकीय संकट आणखी गडद झाले. काँग्रेस, भाजप किंवा डाव्या पक्षांनी त्यांना संकटात टाकले नाही, तर त्यांच्याच पक्षातील आमदार- खासदारांनी बंडाचा झेंडा फडकावून तृणमूल काँग्रेसवरच आमचा पक्ष म्हणून दावा केला आहे. काँग्रेसला शह देण्यासाठी ममता यांनी १९९८ मधे तृणमूल काँग्रेस पक्ष स्थापन केला. आता तोच पक्ष त्यांच्या हातून हिसकावून घेण्यासाठी बंडखोरांनी तयारी केली आहे. ज्यांना आमदार-खासदार केले, तेच ममता यांच्या विरोधात दंड थोपटून उभे आहेत. पश्चिम बंगालमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपला प्रचंड बहुमत मिळणार आणि आपला दारूण पराभव होणार हे पंधरा वर्षे मुख्यमंत्रिपदावर असलेल्या ममता बॅनर्जी यांना कळले नसावे, असे कसे म्हणता येईल? निकालानंतर पक्षाचे ८० आमदार निवडून आले; पण त्यातले बहुसंख्य आपल्याला सोडून जात आहेत, याची त्यांना कल्पना कशी आली नाही? ऐंशीपैकी साठ आमदारांनी वेगळा गट स्थापन केला व विधानसभा अध्यक्षांना पत्र लिहून तृणमूल काँग्रेस म्हणून मान्यताही मिळवली.*

*बंडखोरांचे नेते ऋतब्रत बॅनर्जी यांना विधानसभेतील विरोधी पक्षनेते म्हणूनही मान्यता मिळाली. ज्यांचे नाव विरोधी पक्षनेता म्हणून ममता यांनी विधानसभा अध्यक्षांना पाठवले, त्या पत्रावरील आमदारांच्या स्वाक्षऱ्यांची आता पडताळणी चालू आहे. आपल्या पक्षाचे ६० आमदार आणि २० खासदार महिनाभरात आपल्याविरोधात बंडाचा झेंडा फडकवतील, याचा ममता यांना अंदाज कसा आला नाही? महाराष्ट्रात उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेचे ४० आमदार असेच सुरत, गोवा, गुवाहटीला निघून गेले होते. तेव्हादेखील ठाकरे यांना एवढ्या मोठ्या बंडाची कल्पना कशी आली नाही, असा प्रश्न विचारला गेला होता. एकनाथ शिंदे यांना भाजपने मुख्यमंत्रिपदाची बक्षिसी दिली. एवढेच नव्हे, तर विधानसभा अध्यक्षांनी व निवडणूक आयोगाने शिंदे यांच्या गटाला शिवसेना हे पक्षाचे नाव व धनुष्य बाण हे निवडणूक चिन्हही देऊन टाकले. ठाकरे यांना मशाल चिन्ह घेऊन निवडणूक लढविण्याची वेळ आली. नंतर शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसबाबत तसेच घडले. त्यांनी स्थापन केलेला पक्ष त्यांचे पुतणे अजित पवार ४० आमदारांसह घेऊन गेले.*

*ममतादीदींकडून सर्वच बाबतीत अतिरेक होत होता. ममतांच्या विरोधात बंडाचा झेंडा फडकवणारे आमदार-खासदार हे स्वच्छ आणि आदर्श लोकप्रतिनिधी आहेत असे नव्हे. त्यांनी केलेल्या भ्रष्टाचार, दहशत व घोटाळे यांना ममतांनी नेहमीच संरक्षण दिले. आता ममतांची राज्यातील सत्ता गेली आहे. पुन्हा सत्ता येणे शक्य दिसत नाही. मग, आपल्याला वाचवणार कोण? या विचाराने त्यांचे अनेक सहकारी अस्वस्थ झाले आहेत. ममता यांनी ज्यांना मोठे केले, त्यांच्याच विरोधात लढण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे. पक्षातील अंतर्गत असंतोष दाबण्याऐवजी तो अधिक वाढत गेला, अशीही चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. सत्ताकाळात घेतलेले काही निर्णय आणि त्यांचे परिणाम आता उलट दिशेने परतताना दिसत आहेत. स्थानिक नेतृत्व आणि केंद्रातील नियंत्रण यामधील ताणतणावही या संघर्षाला कारणीभूत ठरल्याचे बोलले जाते. पुढील राजकीय वाटचालीत ममता बॅनर्जींना नव्याने संघटनात्मक पुनर्बांधणी करावी लागेल, असे स्पष्ट दिसते. पश्चिम बंगालचे राजकारण पुन्हा एकदा मोठ्या बदलाच्या उंबरठ्यावर उभे असल्याची चिन्हे आहेत. ममता बॅनर्जी यांची वाटचाल उद्धव ठाकरे व शरद पवारांच्या मार्गाने सुरू झाली आहे. ममता बॅनर्जी यांनी उभा केलेला पक्ष आज त्यांच्या हातातून निसटण्याच्या उंबरठ्यावर उभा आहे. राजकारणात जनतेचा विश्वास आणि सहकाऱ्यांची निष्ठा गमावली की, सर्वात बलाढ्य नेत्यालाही स्वतःच्या अस्तित्वासाठी झगडावे लागते, हेच बंगालच्या घडामोडींनी पुन्हा अधोरेखित केले आहे.*

# मोर्शी कॉलनी परिसरात पाणी टंचाई, गढूळ पाण्याचा पुरवठा

## नागरिकांचे नगराध्यक्षांना निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि. १५मोर्शी –** मोर्शी शहरातील कॉलनी परिसरात नगर परिषद प्रशासनाच्या नियोजन शून्य कारभाराने तीव्र पाणी टंचाई निर्माण झाली आहे. नागरिकांना अनियमित आणि गढूळ पाण्याचा पुरवठा होत असल्याने भारतीय जनता पक्षाच्या नगरसेवकांसह स्थानिकांनी नगराध्यक्षा प्रतीक्षाताई गुल्हाने यांना निवेदन दिले. येत्या पाच दिवसांत शुद्ध व मुबलक पाणी न मिळाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

मोर्शी शहरात जुन्या आणि नवीन अशा दोन मोठ्या पाण्याच्या टाक्या (जलकुंभ) असून, त्यात पुरेसे पाणी साठवण्याची क्षमता आहे. असे असूनही समर्थ कॉलनी, गुरुदेव नगरी, गेडाम लेआउट, गजानन कॉलनी, छायानगर, साई सिटी लेआउट, दीप कॉलनी आणि राधाकृष्ण कॉलनीच्या काही भागांत पाणी पोहोचत नाही. जलवाहिनीला अनेक ठिकाणी गळती लागल्याने पाण्याची मोठ्या प्रमाणावर नासाडी होत आहे.कॉलनी परिसराला गढूळ आणि अशुद्ध पाणी मिळत



असून, या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नगरसेवकांनी केला आहे. नगरपरिषदेचा पाणीपुरवठा विभाग निष्क्रिय असून, त्याचे नियोजन ढिसाळ असल्यामुळे काही भागांत दूषित व दुर्गंधीयुक्त पाणी पोहोचत आहे. यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येऊन साथीचे रोग पसरण्याची भीतीही व्यक्त करण्यात आली.पाण्यामध्ये ब्लिचिंग पावडर आणि लनचे प्रमाण असंतुलित असल्याने पाण्याला दुर्गंधी येत आहे, ही बाब जनतेच्या आरोग्यासाठी अत्यंत गंभीर असल्याचे नगरसेवक नितीन पन्नासे यांनी नमूद केले. समर्थ कॉलनीतील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी खासगी टँकर मागवावे लागतात किंवा 'वॉटर कॅन' विकत घ्यावे लागतात. तरीही नगर परिषद प्रशासनाला जाग येत नसल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. निवेदन देताना नगरसेवक नितीन पन्नासे यांच्यासह हर्षल चौधरी, नगरसेविका प्रीती ब्रह्मानंद देशमुख, जयश्री अजय आगरकर, प्रतिभा कैलास फंदे, मोनाली फंदे आणि इतर नागरिक उपस्थित होते. पाणीपुरवठा योजनेच्या कंत्राटदारावरही यावेळी ठपका ठेवण्यात आला. दलितेतर योजनेतून ६० लाख रुपयांची निविदा काढूनही कंत्राटदाराने कुशल कामगार न वापरल्याने पाणी वितरण व्यवस्था पूर्णपणे बिघडल्याचे निवेदनात म्हटले आहे.

# नाल्याच्या खोलीकरणामुळे नागरिकांना दिलासा

## ग्रामपंचायत व नाम फाउंडेशन च्या पुढाकाराचे कौतुक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५मोर्शी** मोर्शी तालुक्यातील विष्णोरा गावातील नागरिकांना गेल्या अनेक दिवसांपासून नाल्याच्या समस्येने हैराण केले होते. गावाशेजारील नाला गाळाने पूर्णपणे भरल्यामुळे पावसाळ्यात नाल्याला मोठा पूर येत होता. त्यामुळे गावातील अनेकांच्या घरांमध्ये पाणी शिरून संसार उध्वस्त होत होते.सगळ्यात मोठी समस्या म्हणजे नाल्यालगतच गावाच्या पाणीपुरवठ्याची विहीर होती. नाल्याचे गढूळ पाणी विहिरीत झिरपत असल्याने गावाला दूषित व आरोग्यास घातक पाणीपुरवठा होत होता. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला



होता.ही समस्या लक्षात घेऊन ग्रामपंचायतीने पुढाकार घेतला. नाम फाउंडेशनच्या माध्यमातून गावनाल्याच्या खोलीकरणाच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे. गाळ काढल्याने पाण्याचा निचरा सुरळीत होणार असून यापुढे पूर येऊन घरात पाणी घुसण्याची समस्या सुटणार आहे. तसेच विहिरीत गढूळ पाणी जाणेही बंद होणार आहे.नाल्याचे काम सुरू झाल्याने विष्णोरा येथील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. ग्रामपंचायत व नाम फाउंडेशनने वेळेत लक्ष घालून केलेल्या कामाबद्दल नागरिकांनी आभार मानले आहेत.

# कागदपत्रांविना धावणाऱ्या कचरा वाहनांवर आरटीओचा बडगा

## ९८ वाहनांची तपासणी; तीन इंटरसेप्टर पथकांना कारवाईचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५अमरावती–** अमरावती महानगर पालिकेच्या कचरा वाहतूक करणाऱ्या कंत्राटी वाहनांवर प्रादेशिक परिवहन कार्यालयाने (आरटीओ) कारवाईचे आदेश जारी केले आहेत. वैध परवाना, योग्यता प्रमाणपत्र, विमा तसेच प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्रांशिवाय काही वाहने रस्त्यावर धावत असल्याच्या तक्रारीनंतर हा निर्णय घेण्यात आला




आहे.शिवसेनेचे शहर प्रमुख प्रवीण हरमकर यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने आरटीओने कार्यालयीन आदेश क्र. ३७५/२०२६ जारी केला. त्यानुसार कोणार्क कंपनीच्या कचरा वाहतूक करणाऱ्या ९८ वाहनांची सकाळी ६ ते दुपारी १२ या वेळेत अमरावती शहरातील सर्व झोनमध्ये विशेष तपासणी करण्यात येणार आहे. तपासणीदरम्यान आवश्यक कागदपत्रे नसल्याचे आढळल्यास संबंधित वाहनांवर मोटार वाहन कायद्यानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येणार असून त्याचा अहवाल तातडीने सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.या मोहिमेसाठी आरटीओने तीन इंटरसेप्टर पथके नियुक्त केली आहेत. पथकांमध्ये मोटार वाहन निरीक्षक, वरिष्ठ मोटार वाहन निरीक्षक आणि सहाय्यक मोटार वाहन निरीक्षकांचा समावेश असून शहरातील विविध भागांत तपासणी मोहीम राबविली जाणार आहे.नागरिकांच्या सुरक्षेसह वाहतूक नियमांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी ही कारवाई करण्यात येत असल्याचे आरटीओ प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# पेरणीपूर्वीच संकट; शेताच्या मध्यभागी कोसळला विजेचा खांब

## मशागतीची कामे रखडली ;महावितरण चे दुर्लक्ष

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५अंजनगाव बारी**

खरीप हंगामाच्या पूर्वतयारीची लगबग सुरू असतानाच अंजनगाव बारी परिसरातील एका शेतकऱ्याच्या शेतात वादळी पावसामुळे विजेचा खांब कोसळल्याने मशागतीची कामे ठप्प झाली आहेत. त्यामुळे पेरणी रखडण्याची भीती निर्माण झाली असून शेतकऱ्याने महावितरणकडे तातडीने दुरुस्तीची मागणी केली आहे.



नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील मांजरी म्हसला येथील शेतकरी प्रविण भिमराव वासनिक यांचे अंजनगाव बारी शिवारातील सर्वे क्रमांक ५/३ मधील शेतात ३ जून रोजी झालेल्या वादळी पावसामुळे महावितरणचा विजेचा खांब कोसळला. हा खांब शेताच्या मध्यभागी पडल्याने ट्रॅक्टर किंवा बैलांच्या सहाय्याने केली जाणारी पूर्वमशागत पूर्णपणे खोळंबली आहे.सध्या पेरणीचे दिवस जवळ आले असताना खांब हटविल्याशिवाय शेतातील कोणतेही काम करणे शक्य नसल्याने शेतकऱ्याची चिंता वाढली आहे. याबाबत प्रविण वासनिक यांनी महावितरणच्या अंजनगाव बारी उपकेंद्रातील कनिष्ठ अभियंत्यांकडे लेखी निवेदन देऊन तातडीने कारवाईची मागणी केली आहे.पेरणीचा हंगाम सुरू होण्यापूर्वी खांब हटविला नाही तर मोठे आर्थिक नुकसान होईल. प्रशासनाने युद्धपातळीवर दुरुस्तीचे काम करावे, अशी मागणी वासनिक यांनी केली आहे. आता महावितरण या प्रकरणी किती तत्परतेने पावले उचलते, याकडे परिसरातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.-

# शक्तीपीठांपेक्षा ज्ञानपीठांना प्राधान्य द्या; शिक्षणात अधिक गुंतवणुकीची गरज

## माजी शिक्षण सभापती दिपाली विधळे यांचे मत



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५अचलपूर,** देशाच्या विकासाचा खरा पाया शिक्षण असून धार्मिक पर्यटनाबरोबरच शिक्षण क्षेत्रालाही समान प्राधान्य देण्याची गरज असल्याचे मत अचलपूर नगरपालिकेच्या माजी शिक्षण सभापती दिपाली मनीष विधळे यांनी व्यक्त केले आहे. त्यांनी शक्तीपीठांचे नव्हे, ज्ञानपीठांचे महामार्ग उभारा या विषयावर आपली भूमिका मांडताना विकासाच्या सध्याच्या संकल्पनेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.विधळे यांनी म्हटले आहे की, शक्तीपीठांना जोडणारे रस्ते आणि धार्मिक पर्यटनासाठी उभारल्या जाणाऱ्या पायाभूत सुविधा महत्त्वाच्या असल्या तरी प्रत्येक विद्यार्थ्याला शाळा, महाविद्यालय आणि विद्यापीठापर्यंत सहज पोहोचता येईल अशी व्यवस्था निर्माण करणे अधिक गरजेचे आहे. शिक्षण ही खर्चाची बाब नसून भविष्यातील सर्वात मोठी गुंतवणूक असल्याचे त्यांनी नमूद केले.त्यांच्या मते, अनेक ग्रामीण भागांमध्ये आजही विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण, शिक्षक, वाचनालये आणि प्रयोगशाळांच्या सुविधांसाठी संघर्ष करावा लागत आहे. अशा परिस्थितीत विकासाची व्याख्या केवळ सिमेंटचे रस्ते, भव्य इमारती आणि धार्मिक पर्यटनापुरती मर्यादित राहू नये. शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि पर्यावरण यांचा समतोल साधणारा विकासच खऱ्या अर्थाने सर्वसमावेशक ठरू शकतो.विधळे यांनी पर्यावरणीय प्रश्नांकडेही लक्ष वेधले. वाढते काँक्रीटीकरण, उष्णतेच्या लाटा आणि बदलते हवामान लक्षात घेता विकास प्रकल्पांमध्ये शाश्वत नियोजनाला प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.प्रत्येक बंद पडणारी शाळा म्हणजे एका गावाचे भविष्य अंधुक होणे आणि प्रत्येक रिकामे वाचनालय म्हणजे एका विद्यार्थ्याचे अपूर्ण राहिलेले स्वप्न असल्याचे नमूद करत त्यांनी शासन व धोरणकर्त्यांना आत्मपरीक्षण करण्याचे आवाहन केले.प्रत्येक गावात चांगली शाळा आहे का, प्रत्येक विद्यार्थ्याला गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध आहे का आणि प्रत्येक तरुणाला उच्च शिक्षणाची समान संधी मिळते का, असे मूलभूत प्रश्न उपस्थित करत त्यांनी शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य देण्याची मागणी केली.देवाकडे जाणारा मार्ग श्रद्धा दाखवतो; परंतु ज्ञानाकडे जाणारा मार्ग भविष्य घडवतो. राष्ट्राचे खरे वैभव भव्य इमारतींमध्ये नसून विद्यार्थ्यांच्या स्वप्नांमध्ये असते, असेही विधळे यांनी म्हटले आहे.

# डॉ. प्रमोद पोतदार यांचा खासदार सुप्रिया सुळे यांच्या हस्ते सत्कार

## मोर्शी, वरुड रुग्णालयातील अतुलनीय कामगिरीबद्दल गौरव

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५वरुड**

मोर्शी येथील उपजिल्हा रुग्णालय आणि वरुड ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रमोद पोतदार यांचा खासदार सुप्रिया सुळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शस्त्रक्रिया आणि रक्तदानाच्या क्षेत्रात केलेल्या अतुलनीय कामगिरीबद्दल तसेच दोन्ही रुग्णालयांच्या कायापालटासाठी त्यांना गौरविण्यात आले.

हा सत्कार श्री. शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा माजी कृषिमंत्री हर्षवर्धन देशमुख यांच्या ७५ व्या अमृत महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने आयोजित विशेष कार्यक्रमात करण्यात आला. यावेळी खासदार अमर काळे, खासदार बळवंतराव वानखडे, माजी गृहमंत्री अनिल देशमुख, विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी, मोर्शीच्या नगराध्यक्षा प्रतीक्षाताई गुल्हाने, उपाध्यक्ष डॉ. प्रदीप कुऱ्हाडे, डॉ. प्रवीण चौधरी आदी मान्यवर उपस्थित होते. खासदार सुप्रिया सुळे यांनी डॉ. पोतदार यांना दोन चषक, शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मानित केले.



डॉ. पोतदार यांच्या कार्यकाळात मोर्शीच्या उपजिल्हा रुग्णालयाने अनेक महत्त्वपूर्ण पुरस्कार पटकावले आहेत. यामध्ये राज्यस्तरीय एकत्रित महात्मा फुले जनआरोग्य योजना आणि प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत जिल्हाधिकारी यांच्या हस्ते मिळालेला पुरस्कार तसेच राष्ट्रीय कायाकल्प योजनेद्वारे राज्यातून प्राप्त झालेला दहा लाखांचा द्वितीय पुरस्कार यांचा समावेश आहे.त्याचप्रमाणे, वरुड येथील ग्रामीण रुग्णालयालाही अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. यामध्ये वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्य रत्न पुरस्कार, डॉ. आनंदीबाई गौरव पुरस्कार आणि राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमात जिल्हास्तरीय प्रथम पुरस्कार यांचा समावेश आहे.

डॉ. प्रमोद पोतदार यांनी तीन वर्षांच्या कार्यकाळात मोर्शी आणि वरुड येथे महिलांच्या मोफत गर्भपिशवी शस्त्रक्रिया, सामान्य शस्त्रक्रिया, सिझेरियन शस्त्रक्रिया आणि अनेक लघु शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडल्या. त्यांनी पल्स पोलिओ मोहीमही उत्कृष्टरित्या राबवली. विशेष म्हणजे, डॉ. पोतदार यांनी मोर्शी व वरुड येथे रक्तदाता संघाची स्थापना करून हजारो बॉटल रक्त संकलित करण्याचा विक्रमही केला आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# मॉन्सून लांबल्याने पेरण्या खोळंबल्या

## अर्थचक्रावरही परिणाम; २० जूनपर्यंत प्रतीक्षेची वेळ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५ अमरावती–** यंदा मॉन्सूनचे आगमन विलंबाने होणार असल्याने पेरण्यांचे नियोजन विस्कळीत होण्याची शक्यता अधिक आहे. जिल्ह्यात अद्याप पाऊसच झाला नसल्याने पेरण्यांना प्रारंभ होऊ शकलेला नाही. सोयाबीन पेरणीचा काळ कोरडा जाऊ लागला आहे. यंदा वार्षिक सरासरीच्या ९० टक्के पाऊस होण्याची व तीसुद्धा खंडित स्वरूपाची राहणार असल्याने शेतीवरील संकट गडद होऊ लागले आहे. दरम्यान १०० मिमी पाऊस झाल्याशिवाय पेरण्या करू नका, असा सल्ला कृषी विभागाने दिला आहे.

विदर्भात मॉन्सूनचे आगमन साधारणपणे १५ ते २५ जूनदरम्यान होते. सध्या मॉन्सूनची वाटचाल मंदावली असल्याने विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये उष्णतेची तीव्र लाट सुरू आहे आणि मॉन्सूनसाठी हवामान खात्याच्या अंदाजानुसार २० जूनपर्यंत प्रतीक्षा करावी लागणार आहे. विदर्भातील अधिकांश क्षेत्र कोरडवाहू असून पावसाच्या भरोशावर या भागातील शेती अवलंबली आहे. सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद, मका ही या भागातील मुख्य पिके असून सोयाबीनच्या पेरणीचा काळ सुरू झाला असला तरी पावसाचे आगमन न झाल्याने मशागत झालेली शेती प्रतीक्षेतच आहे. बियाणे बाजार थंड आहे. शेतकऱ्यांना दमदार पावसाची प्रतीक्षा आहे. पावसाला विलंब होत असल्याने शेतकऱ्यांचे पेरणीचे नियोजन बिघडू लागले असून त्याचा एकूणच परिणाम उत्पादनाच्या सरासरीवर होणार असल्याने शेतकऱ्यांचे अर्थचक्रही बिघडण्याची शक्यता आहे. हवामान खात्याच्या सुधारित अंदाजानुसार व विदर्भाच्या भौगोलिक परिस्थितीनुसार यंदा पावसाचे वितरण दोन भागांत विभागले जाण्याची शक्यता आहे. पूर्व विदर्भात पावसाचे प्रमाण सामान्य राहण्याचा अंदाज आहे. तर पश्चिम विदर्भातील अमरावतीसह पाच जिल्ह्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.



### वर्षनिहाय मॉन्सूनचे आगमन

वर्ष २०२३ : २३ ते २५ जून

वर्ष २०२४ : २० ते २२ जून

वर्ष २०२५ : १० जूनपूर्वी ( २५ मे, गेल्या ३५ वर्षात सर्वांत लवकर आगमन)

वर्ष २०२६ अंदाज : २० जून

### यंदाचा मृग गेला कोरडा

एक जूनपासून प्रारंभ झालेल्या पावसाळ्यात गेल्या बारा दिवसांत जिल्ह्यात १४.३ मिमी पाऊस झाला आहे. अपेक्षित पर्जन्यमानाच्या सरासरीच्या तुलनेत तो २४.५ टक्के आहे. या कालावधीत ५८.३ मिमी पाऊस अपेक्षित असून ७५.५ टक्क्यांची तूट आहे. सात जूनपासून प्रारंभ झालेल्या मृगनक्षत्राच्या पहिल्या दोन दिवसांत थोडा पाऊस झाला, त्यानंतर मात्र नक्षत्र कोरडे जाऊ लागल्याने चिंता वाढू लागली आहे.

### अमरावतीमधील पावसाचा अंदाज

१३ ते १५ जून : मुख्यत्वे आकाश अंशतः ढगाळ राहील आणि तुरळक ठिकाणी हलका पाऊस पडू शकतो. कमाल तापमान ३७ अंश ते ३८ अंशाच्या आसपास राहील. १८ जून नंतर जिल्ह्यात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता असून, १९ आणि २० जून रोजी मध्यम ते जोरदार स्वरूपाच्या पावसाचा (६५ टक्के शक्यता) अंदाज वर्तविण्यात आला आहे.

# शिकस्त इमारतींचा वाढता धोका

## नोटीस देऊनही मालक–भोगवटदारांकडून दुर्लक्ष

### अतिधोकादायक व धोकादायक प्रवर्गातील ७६ इमारतींची नोंद;अनेक प्रकरणे न्यायालयात असल्याने कारवाईला अडथळे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५ अमरावती**

अमरावती शहरात आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींचा प्रश्न गंभीर बनला आहे. महापालिकेच्या बांधकाम विभागाने केलेल्या सर्वेक्षणात अतिधोकादायक (सी–१) प्रवर्गातील २६ आणि धोकादायक पण दुरुस्तीयोग्य (सी–२ए) प्रवर्गातील ५० अशा एकूण ७६ इमारतींची नोंद करण्यात आली आहे. या इमारती तातडीने रिकाम्या करून पाडण्याबाबत संबंधित मालक व भोगवटदारांना महाराष्ट्र महानगर पालिका अधिनियमाच्या कलम २६४ अंतर्गत नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.मात्र अनेक ठिकाणी इमारतमालक व




भाडेकरूंमधील वाद न्यायालयात प्रलंबित असल्याने नोटिसांना अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. अशा इमारतींमुळे जीवित व वित्तहानी झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित मालक व भोगवटदारांवर राहील, असा इशाराही देण्यात आला आहे.महापालिकेने ३० वर्षांहून अधिक जुन्या इमारतींचे संरचनात्मक लेखापरीक्षण करून आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आवाहन केले आहे. झोननिहाय पाहता राजापेठ झोनमध्ये सर्वाधिक १८ धोकादायक इमारती आढळल्या आहेत. तखतमल व्यापारी संकुल, सेंटर लॉज, इंद्रपुरी हॉटेल, एकवीरा देवी संस्थानची चाळ तसेच गोरक्षण संस्थेसह काही खासगी इमारतींचा या यादीत समावेश आहे. पावसाळ्यापूर्वी या इमारतींबाबत तातडीने निर्णय न झाल्यास मोठ्या दुर्घटनेची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# मेळघाटातील ब्रिटिशकालीन पूल धोकादायक नव्या पुलांच्या उभारणीची मागणी जोरात

### पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर अपघाताची भीती; संरचनात्मक तपासणीसह तातडीच्या उपाययोजनांची गरज

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५धारणी :** मेळघाट परिसरातील शंभर वर्षांहून अधिक जुने ब्रिटिशकालीन पूल सध्या धोकादायक अवस्थेत असून नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. अनेक पुलांचे आयुर्मान संपुष्टात येत असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाने नव्या पुलांच्या उभारणीसाठी तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.धारणी–परतवाडा मार्गावरील सेमाडोहपर्यंत चार ते पाच ब्रिटिशकालीन पूल आहेत. तसेच सेमाडोह गाव आणि सेमाडोह ढाना दरम्यानचा अरुंद पूलही अत्यंत जीर्ण अवस्थेत आहे. या मार्गावरून दररोज नागरिक, शालेय विद्यार्थी, शेतकरी आणि विविध वाहनांची मोठ्या प्रमाणावर ये–जा होत असल्याने दुर्घटनेचा धोका



वाढला आहे.मागील वर्षी याच मार्गावरील एका ब्रिटिशकालीन पुलावरून खासगी बस कोसळून झालेल्या अपघातात चार कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला होता, तर अनेक प्रवासी गंभीर जखमी झाले होते. त्या घटनेच्या आठवणी अजूनही ताज्या असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.तज्ज्ञांच्या मते, या पुलांचे तातडीने स्ट्रक्चरल ऑडिट करून त्यांची सुरक्षितता तपासणे आवश्यक आहे. काही पुलांची दुरुस्ती करून मर्यादित काळासाठी वापर शक्य असला तरी अनेक पुलांची अवस्था चिंताजनक आहे. त्यामुळे नवीन पुलांच्या उभारणीची प्रक्रिया गतीने राबविण्याची गरज व्यक्त होत आहे.ब्रिटिशकालीन पुलांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तात्पुरती डागडुजी केली जाते; मात्र वाढती वाहतूक लक्षात घेता नवीन पूल बांधणे काळाची गरज आहे, असे मत सेमाडोह येथील ग्रामस्थ साबुलाल सेमलकर यांनी व्यक्त केले.पावसाळ्यात वाहतुकीचा ताण वाढणार असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने तपासणी, दुरुस्ती आणि नव्या पुलांच्या उभारणीबाबत ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी मेळघाटवासीयांकडून करण्यात येत आहे.

# महामार्गावरील वृक्षांना आग लावून तोडीचे षडयंत्र?

## वृक्षप्रेमींकडून चौकशीची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५अचलपूर :**

अमरावती–परतवाडा राज्य महामार्गावरील शेकडो वृक्षांना जाणीवपूर्वक आग लावून त्यांचा नाश करण्याचा प्रकार सुरू असल्याचा गंभीर आरोप वृक्षप्रेमींकडून करण्यात आला आहे. वृक्षतोडीला उच्च न्यायालयाचा स्थगनादेश असल्याने काही घटकांकडून वृक्षांच्या बुंध्यांना आग लावून त्यांना जमीनदोस्त करण्याचे षडयंत्र रचले जात असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.आसेगाव आष्टी परिसरासह महामार्गाच्या विविध भागांत अशा प्रकारची अनेक झाडे दिसून येत आहेत. या मार्गावर कडुनिंब,



चिंच, बाभूळ यांसारख्या मौल्यवान प्रजातींची शेकडो वृक्षे वर्षानुवर्षे उभी आहेत. रस्ता रुंदीकरणाच्या कामामुळे वृक्षतोड होणार असल्याच्या भीतीने पर्यावरणप्रेमींनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्यानंतर न्यायालयाने वृक्षतोडीवर स्थगनादेश दिला असून त्यामुळे अनेक वृक्ष वाचले आहेत.दरम्यान, सहा किलोमीटरच्या रस्ता बांधकामासाठी वन विभागाने पूर्वी वृक्षतोडीस परवानगी दिली होती. त्यानुसार काही वृक्षांची तोडही करण्यात आली. मात्र पर्यावरणप्रेमींच्या आक्षेपानंतर ही प्रक्रिया थांबविण्यात आली. आजही तोडलेली झाडे रस्त्याच्या कडेला पडून असल्याचे दिसते.वृक्षप्रेमींच्या मते, कायदेशीररित्या वृक्षतोड शक्य नसल्याने काही ठिकाणी वृक्षांच्या बुंध्यांना आग लावून त्यांना हळूहळू नष्ट केले जात आहे. मागील सहा महिन्यांत सुमारे १०० ते २०० वृक्ष जाळून नष्ट करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.या प्रकरणात महामार्ग प्राधिकरण आणि सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दुर्लक्ष होत असल्याचाही आरोप करण्यात येत आहे. संबंधित विभागांनी तातडीने घटनास्थळांची पाहणी करून दोषींवर कठोर कारवाई करावी तसेच उर्वरित वृक्षांचे संरक्षण करावे, अशी मागणी वृक्षप्रेमी व पर्यावरण कार्यकर्त्यांकडून करण्यात येत आहे.

# उद्या आणि परवा आकाशात दुर्मिळ खगोलीय मेजवानी

### चंद्र, शुक्र, बुध आणि गुरू यांचा मनमोहक संगम

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५अमरावती,**

आकाश निरीक्षकांसाठी जून महिना खगोलीय घटनांची पर्वणी घेऊन आला आहे. चंद्र–शनी युतीनंतर आता १६ व १७ जून रोजी सायंकाळच्या आकाशात चंद्र, शुक्र, बुध आणि गुरू हे चार तेजस्वी खगोलीय पिंड एकाच परिसरात दिसणार आहेत. ही घटना उघड्या डोळ्यांनी सहज पाहता येणार असून आकाशप्रेमींसाठी एक विलक्षण अनुभव ठरणार आहे.

१७ जूनला सायंकाळी पूर्व–ईशान्य दिशेला सूर्यास्तानंतर सुमारे दीड ते दोन तास आधी पाहिल्यास, आकाशात कोरीसारखा दिसणारा क्षीण चंद्र आणि त्याच्या जवळ तेजस्वी शुक्र ग्रह चमकताना दिसेल. शुक्र हा आकाशातील सर्वांत तेजस्वी ग्रह असल्याने त्याला ओळखणे सोपे जाईल. त्याच परिसरात क्षीतिजाजवळ बुध ग्रहदेखील दिसेल. हे तिन्ही खगोलीय पिंड



मिळून आकाशात एक सुंदर त्रिकोणी रचना तयार करतील. खगोलशास्त्राच्या दृष्टीने युती किंवा समूह म्हणजे हे पिंड प्रत्यक्षात जवळ आलेले नसतात. पृथ्वीवरून पाहताना ते एका दिशेत असल्यामुळे आकाशात जवळ दिसतात. अशा घटना खगोलप्रेमींना ग्रहांची ओळख करून घेण्यासाठी उत्तम संधी देतात, असे मराठी विज्ञान परिषदेचे अध्यक्ष प्रवीण गुल्हाने यांनी सांगितले.

निसर्गाची अद्भुत कलाकृती सायंकाळच्या वातावरणात पश्चिम क्षीतिजाकडे नजर टाका. कोरीचा चंद्र, तेजस्वी शुक्र आणि बुध ग्रह यांचा मोहक संगम आपल्या डोळ्यांसमोर अविस्मरणीय खगोलीय चित्र उभे करेल. निसर्गाच्या या कलाकृतीचे साक्षीदार होण्याची संधी दवडू नका, असे आवाहन मराठी विज्ञान परिषदेचे अध्यक्ष प्रवीण गुल्हाने तसेच खगोलप्रेमी विजय गिरूळकर यांनी केले आहे.

# १ ऑगस्टपासून एसटी सवलतीसाठी स्मार्ट कार्ड अनिवार्य; कार्ड नसल्यास लाभ बंद

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१५अमरावती**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) बसमधून प्रवास करणाऱ्या महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिकांसाठी १ ऑगस्ट २०२६ पासून एनसीएमसी (नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड) अर्थात स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्यात आले आहे. या कार्डशिवाय सवलतीच्या दरातील प्रवासाचा लाभ मिळणार नसल्याची माहिती एसटी प्रशासनाने दिली आहे.एसटीचा प्रवास अधिक डिजिटल, पारदर्शक आणि सुलभ करण्याच्या उद्देशाने राज्य सरकारने एनसीएमसी स्मार्ट कार्ड योजना सुरू केली असून, तिच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रशासन युद्धपातळीवर काम करत आहे. राज्यभरातून या योजनेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून आतापर्यंत सुमारे ५१ लाख प्रवाशांनी नोंदणी केली आहे. त्यापैकी २५ लाख प्रवाशांना स्मार्ट कार्ड वितरित करण्यात आले असून उर्वरित कार्डांचे वितरण वेगाने सुरू आहे.



प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी राज्यभरात ४ हजारांहून अधिक अधिकृत वितरण केंद्रे कार्यरत करण्यात आली आहेत. मात्र, काही केंद्रांकडून कार्डासाठी विहित शुल्कापेक्षा जास्त रक्कम आकारली जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर एसटी प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे. अतिरिक्त शुल्क आकारणाऱ्या केंद्रांचा वितरण परवाना तत्काळ रद्द करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.१ ऑगस्टपासून सवलतीचा लाभ सुरू ठेवण्यासाठी पात्र प्रवाशांनी तातडीने जवळच्या बस स्थानकावर किंवा अधिकृत केंद्रावर जाऊन स्मार्ट कार्ड नोंदणी पूर्ण करावी, असे आवाहन महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने केले आहे.

# तिवसा पोलिसांची दमदार कारवाई; ऑटो व अंगणवाडी चोरी प्रकरणाचा छडा, आरोपी अटकेत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५तिवसा,**

तिवसा पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या प्रवासी ऑटो चोरीसह अंगणवाडी केंद्रातील गॅस सिलेंडर व किराणा साहित्य चोरीच्या दोन स्वतंत्र गुन्ह्यांचा तिवसा पोलिसांनी अवघ्या काही दिवसांत यशस्वी छडा लावला. या कारवाईत एकूण ७४ हजार ५८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून आरोपीला अटक करण्यात आली आहे.फिर्यादी बंडू नथुजी पाठक (रा. ममदापूर) यांचा प्रवासी ऑटो (एमएच–२७ एआर–१६०७) १३ जून रोजी तिवसा येथील जुन्या शासकीय



दवाखान्याजवळून चोरीला गेला होता. सुमारे ७० हजार रुपये किमतीच्या या वाहन चोरीप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार पोलिसांनी रेवचंद्र नारायण डोंगरे (वय ३३, रा. ममदापूर) याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने चोरीची कबुली दिल्यानंतर चोरीस गेलेला ऑटो जप्त करण्यात आला.याच आरोपीचा संबंध अंगणवाडी केंद्र क्रमांक ९, ममदापूर येथे १२ जून रोजी झालेल्या चोरीशीही असल्याचे उघड झाले. या घटनेत गॅस सिलेंडर, सोयाबीन तेलाची पाकिटे तसेच हळद व तिखटाची पाकिटे असा ५ हजार ४४० रुपयांचा माल चोरीला गेला होता. आरोपीच्या घराची झडती घेतली असता चोरीस गेलेला गॅस सिलेंडर व किराणा साहित्य असा ४ हजार ५८० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अप्पर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड व उपविभागीय पोलीस अधिकारी प्रभात कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलीस निरीक्षक गोपाल उपाध्याय यांच्यासह पोलीस कर्मचारी नितीन बौरसिया, शुभम गादेकर, नंदू जोगदंडे व सागर शिरसागर यांनी कारवाईत सहभाग घेतला. दोन्ही गुन्ह्यांचा पुढील तपास पोहेकॉ नितीन बौरसिया करीत आहेत.

# शाळांतील रिक्त पदांमुळे विद्यार्थी गुणवत्तेचा उडतोय बोजवारा

### जिल्ह्याच्या शिक्षण विभागाला प्रभारींचे ग्रहण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५अमरावती**

जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाला लागलेले प्रभारींचे ग्रहण सुटता सुटत नसल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. शिक्षण विभागातील शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापकांची अनेक पदे रिक्त असून त्याचा परिणाम थेट शैक्षणिक गुणवत्तेवर होत आहे. याबाबत पालकांसोबतच शिक्षकांकडूनसुद्धा ओरड होत आहे. शासनाचा शालेय शिक्षण विभाग तसेच उच्च न्यायालयाकडून १९ जानेवारी ते १४ मे २०२६ या काळात पदोन्नतीची प्रक्रिया आटोपण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. असे असतानाही अमरावती जिल्हा परिषद अंतर्गत शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख तसेच मुख्याध्यापकांची शेकडो पदे रिक्त आहेत. परिणामी ग्रामीण भागातील शिक्षण विभागाच्या सनियंत्रण करणाऱ्या यंत्रणेचा अतिरिक्त भार इतर शिक्षकांकडे सोपविण्यात आला आहे. परिणामी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून गुणवत्तेचा पार बोजवारा उडाल्याची ओरड शिक्षकांकडून होत आहे. शिक्षण विभागाच्या सनियंत्रण यंत्रणेतील विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक आदी पदे रिक्त ठेवून त्याऐवजी इतर शिक्षकांनाच प्रभारी सनियंत्रण अधिकाराची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यामुळे असा प्रभार असलेल्या शिक्षकांना मूळ पदाचे काम करण्यासाठी वेळच मिळत नाही, ही वास्तविकता आहे. वरिष्ठ पदाचे कार्य करताना विद्यार्थिहित मात्र कमालीचे दुर्लक्षित होत आहे, असा एकंदर सूर शिक्षकांमध्ये आहे. ही महत्त्वाची पदे हेतुपुरस्सर रिक्त ठेवली जात असल्याचा आरोपसुद्धा होत आहे. पदोन्नती न झाल्याने पात्र शिक्षक पदोन्नतीपासून वंचित राहिले आहेत.शेकडो पदे राहणार रिक्त जुन्या तसेच ज्येष्ठ शिक्षकांची पदोन्नती न झाल्यामुळे सुशिक्षित बेरोजगार टीईटी उत्तीर्ण बेरोजगार तरुणांकडे पात्रता असून सुद्धा पवित्र पोर्टलमार्फत नियुक्ती मिळाली नाही. त्यामुळे शिक्षण विस्तार अधिकारी पदापासून सहायक शिक्षकांपर्यंतची शेकडो पदे रिक्त राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



# आधी एन्जिओग्राफी आता किडनी स्टोन

## हर्षजीत देशमुख काँग्रेस उमेदवार म्हणतात...आज नाही न उद्या नाही मतदानाच्या दिवशीही अमरावतीत येणार नाही

## प्रवीण पोटे पाटील यांचा विजयाचा मार्ग अधिक सोपा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

विधान परिषद निवडणुकीसंदर्भात काँग्रेस गोटात संभ्रम निर्माण झाला आहे. पक्षाचे उमेदवार हर्षजीत देशमुख रविवार, १४ जून रोजी अमरावतीत येऊन प्रचाराला सुरुवात करणार होते. मात्र, त्यांना पोटाचा त्रास सुरू झाला असून, डॉक्टरांनी त्यांना किडनी स्टोन झाल्याचे निदान केले आहे. किडनी स्टोनचा आजार निष्पन्न झाल्यामुळे आगामी आठ दिवस डॉक्टरांनी सक्तीची विश्रांती सांगीतली असून, यामुळे आपण प्रचार करु शकणार नाही व अमरावतीत ही येऊ शकणार नाही मात्र अधिकृत उमेदवार म्हणून रिंगणातून मागेही हटणार नाही, अशी भूमिका त्यांनी मांडली





आहे. आपल्या उमेदवाराचा हा पवित्रा पाहून काँग्रेसच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांसह मतदारांचे डोके मात्र चांगलेच चक्रावले आहे.विधान परिषद निवडणुकीच्या चार दिवस आधी, रविवार, १४ जूनपर्यंत हर्षजीत अमरावतीला परत येतील अशी अपेक्षा होती. त्यामुळे इतर काँग्रेस नेतेही त्यांची वाट पाहत होते. पण, सर्वांच्या आशांवर पाणी फेरत, हर्षजीतदेशमुख रविवार, १४ जूनपर्यंत अमरावतीला आले नाहीत. यामुळे काँग्रेस पक्षात प्रचंड तणाव निर्माण झाला आहे.आपल्या प्रकृतीबाबत हर्षजीत देशमुख यांनी रुग्णालयातून माहिती दिली आहे. त्यांच्या रिपोर्टनुसार त्यांच्या शरीरात ११ मिमी आणि ६ मिमी आकाराचे दोन किडनी स्टोन आढळून आले आहेत. डॉक्टरांचे म्हणणे आहे की, किडनी स्टोन काढण्यासाठी सध्या औषधोपचार सुरू आहेत. जर दोन दिवसांतऔषधोपचाराने फरक पडला नाही, तर शस्त्रक्रियेद्वारे किडनी स्टोन काढला जाईल. यामुळे डॉक्टरांनी त्यांना पुढील आठ दिवस पूर्णपणे आराम करण्याचा सल्ला दिला आहे. त्यामुळे ते आता प्रत्यक्ष मतदारांच्या गाठीभेटी आणि प्रचार दौऱ्यात दिसणार नाहीत. विधान परिषदेच्या निवडणुकीत या किडनी स्टोनच्या प्रकरणाचे काय परिणाम होतात, हे पाहणे आता अधिकाधिक रंजक होत आहे.हर्षजीत देशमुख यांच्या नव्या आजारामुळे काँग्रेस नेते आणि नगरसेवक निराश झाले आहेत. स्थानिक काँग्रेस नेते आपल्या विश्वासार्हतेबद्दल चिंतेत आहेत. वरिष्ठ नेत्यांनी स्थानिक काँग्रेस नेत्यांशी सल्लामसलत करून हर्षजीत देशमुख यांना विधान परिषद निवडणुकीसाठी पक्षाचे तिकीट दिले होते. पण, ऐन निवडणुकीत आपल्याच उमेदवाराने तिसरा पाय काढल्याने काँग्रेसमध्ये संभ्रम निर्माण झाला व पदाधिकाऱ्यांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरु झाले. दरम्यान चार दिवसांपूर्वी हर्षजीत यांनी प्रचारासाठी येणार असे सांगितल्यानंतर किंचित आशा निर्माण झाली होती. मात्र आता किडनीस्टोन मुळे येणे जमत नाही. रिंगणात कायम आहे, पण प्रचार करणार नाही, असे हर्षदीप देशमुखांनी सांगितल्याने काँग्रेस पदाधिकाऱ्यांचे डोकेचचक्रावून गेले आहे. परिणामी, काँग्रेसला आपली ढासळती प्रतिष्ठा पुन्हा मिळवण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

# अमरावती विधान परिषद निवडणुकीसाठी

# महायुतीची रणशिंग फुंकली

## प्रवीण पोटे पाटील विक्रमी मतांनी विजयी होतील – रवींद्र चव्हाण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

अमरावती विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीने प्रचार आणि निवडणूक व्यवस्थापनाची मोर्चेबांधणी अधिक वेगाने सुरू केली असून, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत अमरावती येथे महायुतीच्या प्रमुख नेते आणि पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. आगामी निवडणुकीत महायुतीचे उमेदवार प्रवीण पोटे पाटील यांना विक्रमी मतांनी विजयी करण्यासाठी या बैठकीत सविस्तर रणनीती आखण्यात आली. बैठकी नंतर माध्यमांशी बोलताना रवींद्र चव्हाण यांनी प्रवीण पोटे पाटील यांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींचा मोठा पाठिंबा मिळत असून ते मोठ्या मताधिक्याने निवडून येतील,



असा विश्वास व्यक्त केला. महायुतीच्या सर्व घटक पक्षांमध्ये उत्तम समन्वय असून निवडणुकीत विजय निश्चित असल्याचा दावाही त्यांनी केला.या हायप्रोफाईल बैठकीला भाजपचे खासदार डॉ.अनिल बोंडे, युवा स्वाभिमान पक्षाचे नेते व आमदार रवी राणा राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदार सुलभा खोडके, सुरेखा ठाकरे तसेच शिवसेना (शिंदे गट)चे संतोष बद्रे यांच्यासह महायुतीतील अनेक प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. मतदानाचा दिवस जवळ येत असताना प्रत्येक मतदारापर्यंत प्रभावीपणे पोहोचणे, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सदस्यांशी संपर्क वाढवणे आणि महायुतीच्या एकजुटीचे प्रदर्शन घडवून आणणे यावर बैठकीत भर देण्यात आला. निवडणुकीत विजय मिळवण्यासाठीचा अंतिम आराखडा अर्थात 'फायनल गेम प्लॅन' यावेळी निश्चित करण्यात आल्याने अमरावती विधान परिषद निवडणुकीच्या राजकीय घडामोडींना वेग आला आहे.

# श्रीनगरच्या तिरंग्यावरून नेहरूंवर निशाणा

## डॉ. अनिल बोंडे यांचे विधान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती–**

भाजपचे राज्यसभा खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी श्रीनगरमधील तिरंगा आणि कलम ३७०च्या मुद्द्यावरून माजी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्यावर टीका करत वादग्रस्त विधान केले आहे. वीस वर्षांपूर्वी श्रीनगरला गेलो तेव्हा तेथील स्तंभावर तिरंगा नव्हता. तिरंगा नसण्याचे कारण पंडित नेहरू होते, तर आज तिरंगा फडकण्याचे कारण पंतप्रधान नरेंद्र मोदी आहेत, असे बोंडे म्हणाले.कलम ३७० हटवण्याचे



संपूर्ण श्रेय मोदी सरकारला देत, मोदी २०१४ मध्ये पंतप्रधान झाले नसते तर कलम ३७० हटले असते का? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. यावेळी त्यांनी काश्मीरमधील परिस्थितीत झालेल्या बदलांचा उल्लेख करत, पूर्वी सैनिकांवर दगडफेक होत असे, शाळा आणि व्यवहार वारंवार बंद राहत असत तसेच लाल चौकात जाण्यावर निर्बंध होते, असे सांगितले. मात्र आता देशभरातील पर्यटक मुक्तपणे श्रीनगर आणि लाल चौक परिसरात फिरत असल्याचा दावा त्यांनी केला.डॉ. बोंडे यांच्या या वक्तव्यामुळे राज्यातील तसेच राष्ट्रीय राजकारणात नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विरोधकांकडून या विधानावर तीव्र प्रतिक्रिया उमटण्याची शक्यता असून, राजकीय वातावरण तापण्याची चिन्हे दिसत आहेत.

# पावसाच्या विलंबाने आमदार रवी राणा चिंतेत

## शेताच्या बांधावरून शेतकऱ्यांना पेरणीबाबत सावधगिरीचा सल्ला

### शेतात ट्रॅक्टर चालवत केली मशागत

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.१५अमरावती :**

यंदाच्या मान्सूनने अपेक्षित वेळी हजेरी न लावल्याने विदर्भातील शेतकरी चिंतेत असताना बडनेरा विधानसभा मतदारसंघाचे आमदार रवी राणा यांनी स्वतः शेतात उतरून शेतीची पाहणी केली. आपल्या शेतात ट्रॅक्टर चालवत नांगरणी करत त्यांनी पावसाच्या विलंबाबाबत चिंता आणि नाराजी व्यक्त केली. तसेच शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, असे आवाहन त्यांनी केले.आमदार राणा यांनी शेताच्या बांधावरून माध्यमांशी संवाद साधताना सांगितले की, सध्या अनेक शेतकऱ्यांनी खरीप हंगामासाठी तयारी पूर्ण केली असली तरी पुरेसा आणि सातत्यपूर्ण पाऊस पडल्याशिवाय पेरणी करणे धोकादायक ठरू शकते. राज्यातील शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही पाऊस पडेपर्यंत पेरणीची घाई करू नये, असे आवाहन केले असल्याचे त्यांनी नमूद केले.राणा म्हणाले की, शेतकऱ्यांनी सध्या मशागत, नांगरणी आणि इतर पूर्वतयारीची कामे पूर्ण करून शेत तयार ठेवावे. मात्र बियाणे जमिनीत टाकण्याचा निर्णय पावसाच्या स्थितीचा अंदाज घेऊनच घ्यावा. अनेक भागांत ढगाळ वातावरण असले तरी समाधानकारक पाऊस झालेला नाही.

अशा परिस्थितीत घाईघाईने



पेरणी केल्यास पुढील १५ ते २० दिवस पाऊस न आल्यास बियाण्यांचे मोठे नुकसान होऊ शकते.त्यांनी पुढे सांगितले की, पेरणीनंतर पाऊस खंडित झाल्यास उगवण झालेली पिके करपण्याची शक्यता असते. त्यामुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढवू शकते. दुबार पेरणीसाठी अतिरिक्त बियाणे, मजुरी आणि इतर खर्च करावा लागतो. आधीच वाढत्या उत्पादनखर्चामुळे आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना याचा मोठा फटका बसू शकतो.शासनानेही हवामानाच्या परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आवश्यक त्या सूचना वेळोवेळी द्याव्यात, अशी अपेक्षा व्यक्त करत राणा यांनी शेतकऱ्यांनी अधिकृत सल्ला मिळेपर्यंत संयम बाळगावा, असे आवाहन केले. पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांनी घाई न करता योग्य वेळी पेरणी केल्यास संभाव्य नुकसान टाळता येईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.–

# बेलोरा विमानतळावर नाईट लॉण्डिंगची प्रतीक्षा

## डीव्हीओआर व धावपट्टी लाईट्सचे काम पूर्ण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती,** बेलोरा विमानतळावर रात्रीच्या विमानसेवेसाठी आवश्यक असलेल्या डॉपलर व्हीएचएफ ओम्नीडायरेक्शनल रेंज (ऊतजठ) यंत्रणेची उभारणी पूर्ण झाली असून तिची यशस्वी चाचणीदेखील पार पडली आहे. धावपट्टीवरील प्रकाशयंत्रणाही कार्यान्वित करण्यात आली असून, विमानांच्या सुरक्षित उड्डाण व अवतरणासाठी आवश्यक असलेली सर्व प्रमुख तांत्रिक व्यवस्था सज्ज झाली आहे.डीजीसीएच्या तांत्रिक पथकाने आणि अभियंत्यांनी या यंत्रणेची पडताळणी केली आहे. मात्र, नाईट लॅण्डिंग आणि रात्रीच्या विमानसेवेसाठी आवश्यक अंतिम परवानगी अद्याप मिळालेली नसल्याने विमानसेवा सुरू



होण्याबाबत अनिश्चितता कायम आहे. महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरणाकडून आवश्यक कागदपत्रे आणि तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करण्याचे काम सुरू आहे.प्राथमिक चाचणी अंतर्गत रात्री विमानाचे सुरक्षित अवतरण व उड्डाण यशस्वी झाल्यानंतर बेलोरा विमानतळावरून दिवसा आणि रात्री दोन्ही वेळा विमानसेवा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे अमरावतीकरांना मोठा दिलासा मिळणार आहे.

### शहराला होणारे फायदे

पीएम मित्रा टेक्सटाइल पार्कसह विविध औद्योगिक प्रकल्पांमुळे अमरावतीत ये-जा करणाऱ्या उद्योजक, अधिकारी आणि गुंतवणूकदारांची संख्या वाढत आहे. सध्या रात्रीच्या प्रवासासाठी नागपूर विमानतळाचा आधार घ्यावा लागतो. बेलोरातूनच रात्री विमानसेवा सुरू झाल्यास वेळ, खर्च आणि प्रवासाचा त्रास मोठ्या प्रमाणात कमी होईल. मुंबईसह इतर शहरांकडे ऐनवेळी प्रवास करणेही सोयीचे होणार आहे.एअर इंडियाचा पाठपुरावा सुरूबेलोरा विमानतळावरून रात्रीच्या विमानसेवेला मंजुरी मिळावी यासाठी एअर इंडियाकडून डीजीसीएकडे सातत्याने पाठपुरावा केला जात आहे. लवकरच परवानगी मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात असली तरी नाईट लॅण्डिंगची नेमकी तारीख अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही.

परवानगीसाठी आवश्यक प्रक्रिया सुरू असून लवकरच सकारात्मक निर्णय अपेक्षित आहे.– **गौरव उपश्याम,** महाराष्ट्र विमानतळ प्राधिकरण.

# एकच FSSAI, मात्र बाजारात अनेक नावांच्या पाणी बॉटल्स

## अमरावती जिल्ह्यातील प्रकारावर अन्न प्रशासन मौन का?

## हॉटेल, कार्यक्रम आणि पार्ट्यांसाठी वेगवेगळ्या ब्रँडच्या नावाने पाणी विक्री

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.१५अंजनगाव सुर्जी**

अमरावती जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याच्या बॉटल व्यवसायात एक धक्कादायक प्रकार मोठ्या प्रमाणात सुरू असल्याची चर्चा रंगू लागली आहे. जिल्ह्यातील अनेक तालुक्यांमध्ये एकाच पाणी उत्पादक कंपनीकडून विविध हॉटेल्स, लॉन्स, मंगल कार्यालये, राजकीय कार्यक्रम तसेच खासगी समारंभांसाठी वेगवेगळ्या नावांच्या पाणी बॉटल्स छापून पुरवठा केला जात असल्याची माहिती समोर येत आहे.विशेष म्हणजे, बाजारात वेगवेगळ्या ब्रँडच्या नावाने



दिसणाऱ्या या बॉटल्सच्या मागे प्रत्यक्षात एकच उत्पादन यंत्रणा आणि एकच ऋडड-ख नोंदणी क्रमांक असल्याची चर्चा आहे. त्यामुळे ग्राहकांची दिशाभूल होत आहे का, तसेच अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन होत आहे का, असा गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे.जिल्ह्यातील अनेक हॉटेल्स, कार्यक्रम आयोजक आणि व्यावसायिकांना त्यांच्या नावाने खास लेबल लावून पाणी बॉटल्स पुरवल्या जात असल्याचे सांगितले जाते. परिणामी, ग्राहकांना त्या स्वतंत्र ब्रँडच्या असल्याचा भास निर्माण होतो. मात्र प्रत्यक्षात उत्पादन एकाच ठिकाणी होत असल्यास आणि त्याबाबत आवश्यक नियमांचे पालन होत नसेल, तर हा प्रकार चौकशीचा विषय ठरू शकतो.धक्कादायक बाब म्हणजे, अमरावती जिल्ह्यातील विविध एमआयडीसी क्षेत्रांसह काही ठिकाणी घरगुती स्तरावरूनही अशा बॉटल्सचा पुरवठा होत असल्याची चर्चा असून, या संपूर्ण साखळीची तपासणी करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.अन्न व औषध प्रशासन विभागाकडे या संदर्भात अनेकदा तक्रारी झाल्याची चर्चा असली, तरी आतापर्यंत कोणतीही ठोस कारवाई झालेली दिसून आलेली नाही. त्यामुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात सुरू असलेल्या या व्यवसायाकडे संबंधित विभागाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे का, अशीही चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.दरम्यान, अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे हे अमरावती जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असल्याच्या पार्श्वभूमीवर या संपूर्ण प्रकरणाची दखल घेतली जाणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे

# मानवाधिकार असोसिएशनची आयुक्तांकडे तक्रार

## नगरपालिका प्रशासनावर चालढकलचा आरोप

### अचलपूर नगर परिषदेतील अनियमिततेवर कारवाईची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १५अचलपूर–**

आंतरराष्ट्रीय मानवाधिकार वेलफेअर असोसिएशनने अमरावती विभागीय आयुक्त कार्यालयातील नगरपालिका प्रशासनावर कामकाजात चालढकल केल्याचा आरोप करत तक्रार केली आहे. विभागीय आयुक्त नयना गुंडे यांना यासंदर्भात निवेदन सादर करण्यात आले असून, न.प. प्रशासन विभागाच्या कामकाजात सुधारणा करण्याची मागणी करण्यात आली आहे.

अचलपूर येथील किशोर केशवराव मोहोड यांनी महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई येथे तक्रार



केली होती. अचलपूर नगर परिषदेने अनुसूचित जाती वस्ती विकास योजनेअंतर्गत मिळालेल्या अनुदानाच्या खर्चात अनियमितता केल्याचे त्यांनी निदर्शनास आणले होते.या प्रकरणी मानवी हक्क आयोगाने १२ फेब्रुवारी २०२५ रोजी आदेश पारित करत प्रधान सचिव, नगर विकास विभाग-२ यांना आवश्यक कार्यवाहीचे निर्देश दिले होते. त्यानुसार, अवर सचिव, नगर विकास विभाग-१५ यांनी १८ नोव्हेंबर २०२५ रोजी अमरावती येथील नगर परिषद प्रशासन शाखेला पत्र पाठवून तीन दिवसांत अभिप्राय सादर करण्यास सांगितले होते. मात्र, या आदेशानुसार अद्याप शासनाला कोणताही अभिप्राय सादर करण्यात आलेला नाही.तक्रारीनुसार, नगर विकास विभागाच्या मुंबई कार्यालयाने विभागीय चौकशी नियम पुस्तिका, १९९१ मधील परिच्छेद ६.४ ते ६.८ नुसार दोषारोपपत्र प्रारूप (परिशिष्ट १ ते ४) संदर्भात कार्यवाही करून अभिप्राय सादर करण्याचे निर्देश दिले होते. परंतु, नगर परिषद प्रशासन शाखेमार्फत मागील सहा महिन्यांपासून कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही.यामुळे संबंधित नगर परिषद प्रशासन शाखेला तात्काळ निर्देश देऊन या प्रकरणात विभागीय चौकशी सुरू करावी, तसेच शासनास आवश्यक अभिप्राय त्वरित सादर करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी राजेश इजवे, पदाधिकारी सुमीत बिजवे, संजय भोरे, एकनाथ आगासे, किशोर मोहोड यांनी केली आहे.


